

# अंतर्यामी . . .

डोहात कसा हा तरंग उसळून आला
सर्वांगावर स्वैर कसा विखूरला
मुरलीवर तव सूर लाघवी भरला
अन् अंतर्यामी नाद तुझा रे जडला

आभाळ निळे डोहात पुरे उतरले
स्नान कराया डोहामध्ये शिरले
स्पर्शाने त्या नीर पुरे मंथरले
अंतर्यामी प्रणयरंग उमटले

वेणूवर तव मोरपिसे नाचली
तालावर त्या गिरीशिखरे थरथरली
अमृतप्राशना देहा डोही शिरली
कैसी किमया अंतर्यामी भरली?

विजय पाठारे